क्र.मविनिआ/विधी-III/माअअ/अपिल/०५/२०२२/०२२५ दिनांक- २४.०५.२०२२

**अपील क्र. ०५/२०२२**

प्रति,
श्री. जगनसिंह राजपूत,
ओमसाई निवास, बॅ.नं.८,
रूम नं.४, उल्हासनगर-१,
जि. ठाणे-४२१००१.
मो.नं.९८६०१९७८०८

**संदर्भ-** आपले दिनांक २२.०४.२०२२ रोजीचे अपील. (आयोगाच्या कार्यालयास प्राप्त दिनांक २६.०४.२०२२)

वरिल संदर्भान्वये आपणास कळविण्यात येत आहे की, आपण/अपिलार्थी यांनी दिनांक १५.०३.२०२२ रोजी माहितीचा अधिकार कायदा, २००५ अन्वये माहिती अर्ज केलेला होता व तो जनमाहिती अधिकारी, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई यांनी पत्र क्र. MERC/ADM/RTI/013/2022/0104, दिनांक १७.०३.२०२२ रोजी माहितीचा अधिकार कायदा, २००५ चे कलम ६(३) अन्वये जनमाहिती अधिकारी, महावितरण, प्रकाशगढ, वांद्रे, मुंबई यांना वर्ग करून अपिलार्थी यांना माहिती परस्पर उपलब्ध करून देवून अर्ज निकाली काढण्यास कळविले व सदर अर्जावरती झालेल्या कार्यवाहिचा तपशील जनमाहिती अधिकारी, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई यांना कळविण्यात यावे असे कळविले आहे.

वरिल पत्राच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा अतिरिक्त कार्यकारी अभियंता (देयक व महसूल), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगढ, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ यांनी सदरहू माहिती अर्ज दिनांक १२.०४.२०२२ रोजी कार्यकारी अभियंता तथा माहिती अधिकारी (प्रशासन), महावितरण, कल्याण मंडळ-२, कल्याण (प.) यांना वर्ग करण्यात आलेला आहे व त्याची प्रत अपिलार्थी श्री. जगनसिंह राजपूत यांना पाठविलेली आहे.

वरील पत्रांच्या अनुषंगाने व तथ्यांनुसार अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज हा कार्यकारी अभियंता तथा माहिती अधिकारी (प्रशासन), महावितरण, कल्याण मंडळ-२, कल्याण (प.) यांनी निकाली



१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in **Website :** www.merc.gov.in

काढावयाचा आहे परंतु, सदर माहिती अर्ज हा निकाली काढला आहे किंवा नाही याविषयी आयोगाच्या कार्यालयास/जनमाहिती अधिकारी यांना कोणतीही माहिती उपलब्ध नाही. करीता, कार्यकारी अभियंता तथा माहिती अधिकारी (प्रशासन), महावितरण, कल्याण मंडळ-२, कल्याण (प.) हे माहितीचा अर्ज निकाली काढतील किंवा प्रकरण निकाली काढले असल्यास या प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी हे कार्यकारी अभियंता तथा अपिलीय प्राधिकारी, महावितरण, देयक व महसूल विभाग, ४ था मजला, प्रकाशगढ, वांद्रे (पूर्व), मुंबई हे सक्षम अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी आहेत. करीता अपिलार्थी यांनी दिनांक २२.०४.२०२२ रोजी केलेले अपील जे की आयोगाच्या कार्यालयास दिनांक २६.०४.२०२२ रोजी प्राप्त झालेले आहे, ते अपील निष्फळ ठरलेले आहे तसेच या माहिती अर्जान्वये प्रथम अपीलीय अधिकारी हे महावितरणचे असल्यामुळे आयोगातील प्रथम अपीलीय अधिकारी हे अधिकारहीन झालेले आहेत, करिता अपिलार्थी यांना असे कळविण्यात येते की, आपण आपले प्रकरण/माहिती संदर्भात कार्यकारी अभियंता तथा माहिती अधिकारी (प्रशासन), महावितरण, कल्याण मंडळ-२, तेजश्री बिल्डींग, ३रा माळा, कर्णिक रोड, कल्याण (प.)-४२१३०१ यांच्याकडे पाठपुरावा करावा.

करिता, आपल्या माहितीस्तव सादर.

24.5.22

(अनिलकुमार उके)
संचालक विधी (प्रभारी)
तथा प्रथम अपिलीय अधिकारी

प्रत- जनमाहिती अधिकारी, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांना माहितीस्तव.